MHAU080010242022

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ११२/२०२२</u>**
**<u>अहेमदखाँ वि. अलिखाँ व इतर</u>**

**<u>निशाणी ५ वरील आदेश</u>**
**<u>(पारीत दि. १५.०३.२०२४ रोजी)</u>**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रीया संहिता, १९०८ चे आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादींविरुध्द तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याकरिता केला आहे.

२. **<u>वादी यांचे थोडक्यात कथन असे की,</u>**

वादी यांचे कायदेशीर मालकी व प्रत्यक्ष ताबा, वहीवाटीत मौजे नानेगाव, ता. सिल्लोड शिवारातील शेतजमीन, ज्याचा गट क्र.४६ क्षेत्रफळ ०२ हे. ००आर. पोटखराब ००हे. १०आर. शेतजमीन ज्याची चतुःसिमा पुढीलप्रमाणे:– पूर्वेस – अजमेरखॉ सुपडू दंहीगल व इतर यांची जमीन, पश्चिमेस – फकीरा शरीफ बेमरोठ व सत्तार शरीफ बेमरोठ यांची जमीन, दक्षिणेस – मंहमंद बशीर व गफुर बशीर यांची जमीन, उत्तरेस – नवाजखाँ अब्दुलखाँ दहीगल यांची जमीन या चतुःसिमे अंतर्गत असलेले शेतजमीनीत वादी हे एकमेव कायदेशीर मालक व प्रत्यक्ष कब्जेदार या नात्याने निरंतर उपभोग घेत आलेले आहेत. (सदर मिळकतीस दावा मिळकत असे संबोधण्यात आले आहे.)

३. अर्जदाराचे कथन असे की, प्रस्तुत दावा मिळकतीचे पूर्वीचे मालक हे अब्दुलखॉ मकबूल (वादी यांचे वडील) हे होते. त्यांनी त्यांच्या हयातीत दि.२३.०१.१९८९ रोजी, गट नं.४६, ५२, ४३ मधील जमीन ही वादी व प्रतिवादी तसेच नवाजखाँ अब्दुलखॉ, अहेमदखॉ अब्दुलखॉ, महेबुबखॉ अब्दुलखॉ, अलिखॉ अब्दुलखॉ (प्रतिवादी क्र.१), मस्तानखॉ अब्दुलखॉ, शरिफाबी अब्दुलखॉ यांना वाटणी पत्राआधारे वाटून दिलेली आहे. सदर वाटणीपत्राधारे महसुल दप्तरी फेरफार क्र.१३४ हा मंजूर झालेला असून ७/१२ उताऱ्यात नोंद आजही विनाआव्हानीत कायम आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी कुठल्याही कोणताही काही एक कायदेशीर हक्क व संबंध नाही. परंतु प्रस्तुत प्रतिवादी हा कट कारस्थानाने प्रेरीत होवून वादीस दावा मिळकतीचे कायदेशीर मालक व प्रत्यक्ष कब्जावहीवाटीतून बेदखल करण्याचे उद्देशाने प्रेरीत होवून तसेच दावा मिळकत गिळंकृत करण्याच्या हेतूने सतत अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. वादीस प्रस्तुतचा दावा दाखल करण्याचे कारण दि.१८.०४.२०२२ रोजी घडले आहे. वादी व त्यांचा मुलगा हे शेताची नांगरणी करण्यासाठी गेले असता नमूद प्रतिवादी हे वादीच्या शेतात आले व वादी यांना व त्यांच्या मुलाला अश्लिल भाषेत शिवीगाळ करुन, ''भोसडीच्या तुम्ही जास्त मस्ताडले'' हे शेत आम्हाला देवून टाका, पुन्हा जर येथे आले तर तुम्हाला याच शेतात जिवंत गाडून टाकु, असे म्हणून वादीच्या पाठीत दगड मारला व त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली. याबाबत वादीने तात्काळ पोलिस स्टेशन अजिंठा येथे प्रतिवादी यांच्या विरुध्द रितसर फिर्याद दाखल करण्यासाठी गेले असता, पोलिसांनी सदरचे प्रकरणे हे दिवाणी स्वरुपाचे असल्यामुळे मा. न्यायालयात दाद मागण्याची समज दिली. त्यामुळे प्रस्तुतचे प्रकरण सादर करण्याचे कारणे घडले आहे. प्रतिवादी यांचे सदरचे गैरकृत्य हे

बेकायदेशीर असून प्रतिवादी यांच्या सततच्या गैरकृत्यामुळे, धाकदपटशाहीमुळे, दंडेलवृत्तीमुळे, वादीस त्याचे कायदेशीर मालकी व प्रत्यक्ष उपभोगातील दावा मिळकती कास्त करणे अत्यंत अवघड झाले आहे. प्रतिवादी हे कायदा हातात घेवून वादीना त्याचे कायदेशीर मालकी व शांतीपूर्व कब्जातील दावा मिळकतीतून बेदखल करण्याचे प्रयत्नात आहे, त्यामुळे वादीच्या कायदेशीर हक्काला बाधा निर्माण झाली आहे. करीता प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांचे विरुध्द मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. प्रस्तुत प्रकरण प्रतिवादी क्र.१ ते ७ यांचेविरुध्द नि.क्र.१ वरील आदेशानुसार विना कैफीतय चालविण्यात येत आहे. प्रस्तुत अर्जावर देखील प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही.

५. प्रस्तुतच्या अर्जावर वादीतर्फे वकील श्री. आर. एन. कुलकर्णी व प्रतिवादींतर्फे श्री.ए.व्ही. देशपांडे यांचा युक्तीवाद ऐकला.

६. वादीने या अर्जाच्या समर्थनार्थ दस्त यादी नि.क्र.४ सोबत, गट क्र.४६ नानेगाव, ता. सिल्लोड ची ७/१२ उताऱ्याची व फेरफार पत्रक अनु.क्र.१३४ ची छायांकित प्रत दाखल केली आहे.

७. वादीच्या अर्जातील कथने, आणि अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा विचारात घेता या अर्जाच्या निवाड्यासाठी माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित झाले, त्यावर कारणांसह पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादींनी हे सिध्द केले आहे का, की, त्यांची प्रथमदर्शनी केस (दावा) आहे का? | ...नकारार्थी |
| २ | वादींनी हे सिध्द केले आहे का, की, न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने आहे ? | ....नकारार्थी |
| ३ | वादींनी हे सिध्द केले आहे का, की, तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास त्याचे कधीही न भरुन येण्याजोगे नुकसान होणार आहे काय? | ....नकारार्थी |
| ४ | काय आदेश ? | अर्ज नामंजूर. |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुद्दे क्र. १ ते ३ करीता –</u>**

८. वादी यांच्या कथनानुसार, दावा मिळकतीचे पूर्वीचे मालक हे अब्दुलखॉ मकबूल (वादी यांचे वडील) हे होते. त्यांनी त्यांच्या हयातीत दि.२३.०१.१९८९ रोजी, गट नं.४६, ५२, ४३ मधील जमीन ही वादी व प्रतिवादी तसेच नवाजखाँ अब्दुलखॉ, अहेमदखॉ अब्दुलखॉ, महेबुबखॉ अब्दुलखॉ, अलिखॉ अब्दुलखॉ (प्रतिवादी क्र.१), मस्तानखॉ अब्दुलखॉ, शरिफाबी अब्दुलखॉ यांना वाटणी पत्राआधारे वाटून दिलेली आहे. सदर वाटणीपत्राधारे महसुल दप्तरी फेरफार क्र.१३४ हा मंजूर झालेला असून ७/१२ उताऱ्यात नोंद आजही विनाआव्हानीत कायम आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी कुठल्याही कोणताही काही एक कायदेशीर हक्क व संबंध नाही. परंतु प्रस्तुत प्रतिवादी हा कट कारस्थानाने प्रेरीत होवून वादीस दावा मिळकतीचे कायदेशीर मालक व प्रत्यक्ष कब्जावहीवाटीतून बेदखल करण्याचे उद्देशाने प्रेरीत होवून तसेच दावा मिळकत गिळंकृत करण्याच्या हेतूने सतत अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. वादीस

प्रस्तुतचा दावा दाखल करण्याचे कारण दि.१८.०४.२०२२ रोजी घडले आहे. वादी व त्यांचा मुलगा हे शेताची नांगरणी करण्यासाठी गेले असता नमूद प्रतिवादी हे वादीच्या शेतात आले व वादी यांना व त्यांच्या मुलाला अश्लिल भाषेत शिवीगाळ करुन, ''भोसडीच्या तुम्ही जास्त मस्ताडले'' हे शेत आम्हाला देवून टाका, पुन्हा जर येथे आले तर तुम्हाला याच शेतात जिवंत गाडून टाकु, असे म्हणून वादीच्या पाठीत दगड मारला व त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली. याबाबत वादीने तात्काळ पोलिस स्टेशन अजिंठा येथे प्रतिवादी यांच्या विरुध्द रितसर फिर्याद दाखल करण्यासाठी गेले असता, पोलिसांनी सदरचे प्रकरणे हे दिवाणी स्वरुपाचे असल्यामुळे मा. न्यायालयात दाद मागण्याची समज दिली. त्यामुळे प्रस्तुतचे प्रकरण सादर करण्याचे कारणे घडले आहे. प्रतिवादी यांचे सदरचे गैरकृत्य हे बेकायदेशीर असून प्रतिवादी यांच्या सततच्या गैरकृत्यामुळे, धाकदपटशाहीमुळे, दंडेलवृत्तीमुळे, वादीस त्याचे कायदेशीर मालकी व प्रत्यक्ष उपभोगातील दावा मिळकती कास्त करणे अत्यंत अवघड झाले आहे. प्रतिवादी हे कायदा हातात घेवून वादीना त्याचे कायदेशीर मालकी व शांतीपूर्व कब्जातील दावा मिळकतीतून बेदखल करण्याचे प्रयत्नात आहे, त्यामुळे वादीच्या कायदेशीर हक्काला बाधा निर्माण झाली आहे. परंतु येथे उल्लेख करण्याजोगे बाब अशी की, या संदर्भात वादींनी पोलीस स्टेशन अथवा कोठेही केलेला तक्रार अर्ज किंवा तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा अर्जासोबत दाखल केलेला नाही. तसेच वादी यांनी त्यांच्या अर्जाच्या समर्थनार्थ कोणतेही कागदोपत्री पुरावा अर्जासह दाखल केलेला नाही. वादीने अर्जाच्या समर्थनार्थ केवळ गट क्र.४६ चा ७/१२ उतारा व फेरफार पत्रक अनु.क्र.१३४ ची छायांकित प्रत दाखल केली आहे. केवळ त्यामुळे वादीची केस प्रथमदर्शनी दिसून येत नाही. प्रस्तुत अर्ज निकाली काढतांना, आवश्यक असणारे तिनही मुद्दे आणि वादीची

प्रथमदर्शनी केस असल्याचे सद्यस्थितीत दिसून येत नाही. अशा परिस्थितीत त्यामुळे, तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास वादीचे नुकसान होईल ही बाब वादीने सिध्द केली आहे, हे म्हणणे न्यायोचित होणार नाही. म्हणून मी मुद्दे क्र. १ ते ३ करिता नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ साठी</u> –**

९. वर केलेली चर्चा व मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्ष विचारात घेता वादीचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्र. ४ चे उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे–

**<u>आदेश</u>**

१. वादीचा निशाणी ५ चा अर्ज नामंजुर.
२. वादी व प्रतिवादी यांनी अर्जाचा खर्च ज्याचा त्यांनी सोसावा.

MINAKSHI MANOHAR DHANRAJ
Digitally signed by MINAKSHI MANOHAR DHANRAJ
Date: 2024.03.15 17:37:05 +0530

**(श्रीमती मिनाक्षी म. धनराज)**

दिनांक – १५.०३.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सिल्लोड.

## CERTIFICATE

" I affirms that the contents of this **P.D.F.** file order are same word to word as per original order".

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : F. U. Tadavi. |
| Court Name | : Smt. Minakshi M. Dhanraj<br>Jt. Civil Judge Jr. Div., Sillod. |
| Date | : 15.03.2024 |
| Order signed by presiding officer on | : 15.03.2024 |
| Order uploaded on | : 15.03.2024 |